लोकमत

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

---

# जाहिरात

## भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२० मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजुरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नवीन मंजुरीचे आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पद्धतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजुरीसाठी केंद्र शासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

नवीन मंजुरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १. | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१ ऑक्टोबर २०२० |
| २. | महाविद्यालयाने अर्जाची ऑनलाईन पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक | १५ नोव्हेंबर २०२० |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी www.scholarships.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या Helpline No. 0120-6619540 या क्रमांकावर किंवा helpdesk@nsp.gov.in या ई-मेल वरुन संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक 020-26126939 / 29707098 वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

**(सदर शिष्यवृत्तीबाबतची सविस्तर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)**

(डॉ. धनराज माने)
नोडल ऑफिसर तथा संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

डी.जी.आय.पी.आर.२०१९/२०२०/717

Aurangabad Main
Page No. 4 Sep 18, 2020
Powered by: erelego.com

अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या. लिंकला टच करा. https://digitaldg.in/

व्हिडीओ बघण्यासाठी YouTube https://www.youtube.com/c/DigitalDG/videos